# अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद

येथील नाट्यगृहात रंगभूमिदिनी दिनांक ५ नोव्हेंबर २०११ रोजी घेण्यात आली, अंतीम फेरीसाठी निवडण्यात आलेल्या सहा एकांकिकामधून पहिल्या चार एकांकिकांना रोख बक्षीसे देण्यात आली.
ती खालीलप्रमाणे :-

| अ. क्र. | सर्वोत्कृष्ट एकांकिका | एकांकिकेचे नांव | शाखेचे नांव | रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | प्रथम | पाणीपुरी | नाशिक | १५,००० |
| २ | द्वितीय | जाहला सोहळा अनुपम | अहमदनगर | ११,००० |
| ३ | तृतीय | शांडिल्य | अकोला | ८,००० |
| ४ | उत्तेजनार्थ | वीसच गणित | सोलापूर उपनगरीय | २,००० |

तसेच लेखन, दिग्दर्शन, उत्कृष्ट स्त्री आणि पुरूष कलावंत, नेपथ्य, प्रकाशयोजना यासाठीही पारितोषिके प्रत्येकी प्रथम क्रमांक रू. १०००/- द्वितीय क्रमांक रू. ७५०/- आणि तृतिय क्रमांक रू. ५००/- देण्यात आली. तसेच प्रत्येक विभागासाठी उत्तेजनार्थ पारितोषिके देण्यात आली. पारितोषिक वितरणाचा कार्यक्रम त्याचदिवशी सांस्कृतिक कार्य संचालक श्री. अशुतोष घोरपडे यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. अंतीम स्पर्धेचे परिक्षक म्हणून श्री. उपेंद्र दाते, श्री. भूषण कडू आणि श्रीमती आशालता यांनी काम पाहिले. स्पर्धा नियोजन समितीमध्ये श्री. शिवाजी शिंदे, श्री. सतीश लोटके, श्री. दिगंबर आगाशे आणि श्रीमती गीता सोमण यांचा समावेश होता.

## यशवंत नाट्यमंदिर

आपल्या यशवंत नाट्यमंदिरास चांगल्या प्रकारे प्रतिसाद मिळत असून नाट्यगृहात होणाऱ्या कार्यक्रमात उत्तरोत्तर वाढ होत आहे. वर्षभरात नाट्यगृहात एकूण सहाशे तेहतीस कार्यक्रम सादर करण्यात आले. त्यात मराठी नाटके, इतर भाषिक कार्यक्रम, शुटींग, सभा, संगीताचे कार्यक्रम यांचा समावेश आहे. या कार्यक्रमाच्या निमित्ताने अनेक नामवंत व प्रसिध्द व्यक्तींनी नाट्यगृहास भेट दिली आहे. आपले नाट्यगृह मराठी नाटकांना कमीत - कमी दरात उपलब्ध करून दिले जात असून प्रायोगिक रंगभूमी, बालरंगभूमी आणि हौशी रंगभूमीसाठी नाट्यगृहाच्या भाड्यात पन्नास टक्के सवलत देण्यात येते. नाट्यगृहात मराठी कार्यक्रमांप्रमाणे शुटींग, सभा, इतर भाषिक कार्यक्रम होतात. आपल्या नाट्यगृहास रसिकांचा चांगल्याप्रकारे प्रतिसाद मिळत आहे.

## ९२ वे नाट्य संमेलन २०१२
## सांगली

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या विद्यमाने सांगली येथे ९२ वे अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलन दि. २० ते २२ जानेवारी, २०१२ या तीन दिवसांच्या कालावधीत कल्पद्रुम क्रीडांगण, राजमती परिसर, सांगली येथील बालगंधर्व नगरीत आयोजित करण्यात आले.